# थोडक्यात महत्त्वाचे



**कुंडल :** झाकिर हुसेन संदे व प्रा. सुरज साळुंखे यांचा सत्कार करतांना डॉ. आर. एस. डुबल, गोविंदराव डुबल.

## डॉ. झाकिर हुसेन संदे व साळुंखे हे सेट परीक्षा उत्तीर्ण

**कुंडल :** येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. झाकिरहुसेन संदे व सुरज साळुंखे यांचा सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल व गांधी एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार गोविंदराव डुबल यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. कराड येथील डॉ. झाकिरहुसेन संदे यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय येथे तर पदव्युत्तर शिक्षण सदगुरु गाडगे महाराज कॉलेज कराड येथे झाले आहे. त्यांनी यापूर्वी राज्यशास्त्र या विषयामध्ये एम.फील, पी.एचडी पदवी प्राप्त केली आहे. देवराष्ट्रे येथील प्रा. सुरज साळुंखे रसायानशास्त्रामध्ये पी.एचडी करत आहेत. सन २०२१ पासून महाविद्यालयामध्ये ते रसायणशास्त्र विषयाचे अध्यापन करत आहेत. दोन्ही प्राध्यापकांनी मिळविलेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आ. अरुण लाड, उपाध्यक्ष चंद्रकांत रोकडे, साचिव ॲड. प्रकाश लाड, किरण लाड यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.



**कुंडल :** आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन प्रसंगी आमदार अरुण लाड, संजय आनंदे, डॉ. आर. एस. डूबल आदी.

## क्रांतिअग्रणी महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्राचा शुभारंभ

**केसरी वृत्तसेवा**

**कुंडल :** आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते ऑनलाइन पद्धतीने कुंडल (पलूस) येथील क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये करण्यात आले. यावेळी ऑनलाईन प्रक्षेपणासाठी पुणे पदवीधरचे आमदार अरुण लाड, सांगली जिल्हा कौशल्य विभागाचे नोडल ऑफिसर संजय आनंदे, प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डूबल, रणधीर शिंदे, डॉ. प्रताप लाड, डॉ. भरत जाधव आदीसह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. संयोजन कौशल्य विकास केंद्रांचे संयोजक प्रा. भारती सुतार, डॉ. विवेकानंद माने यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी केले.

दै. केसरी
दि. 25/09/2024